<u>आरोग्य सेवा</u>

जा.क्र./जिमबालरुकु/1675/२०२५
जिल्हा महिला व बाल रुग्णालय कुडाळ
दिनांक १७/६/२०२५

## दरपत्रक सुची

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा महिला व बाल रुग्णालय कुडाळ येथे गरोदर मातांसाठी सोनोग्राफी करिता स्थानिक पातळीवर फक्त कुडाळ शहराकरिता करार निश्चित करणेकरिता दरपत्रक पध्दतीने करणे प्रस्तावित आहे.

त्यासाठी पुरवठादाराकडुन खालील अटींच्या अधिन राहुन मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे. अटींची पूर्तता करणाऱ्या पुरवठादारांपैकी दरपत्रके खाली सही करणार यांच्या नावे सुट्टीचे दिवस वगळून दिनांक १८/६/२०२५ रोजीपासून ते दिनांक २६/६/२०२५ रोजीपर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पोस्टाने किंवा प्रत्यक्ष जिल्हा महिला व बाल रुग्णालय कुडाळ येथे आणुन देणेचे आहे.

**अटी व शर्थी -**

१) सबंधित संस्थेचे नोंदणीपत्रक, पॅनकार्ड व आवश्यक ते सर्व पात्रतेचे निकष पूर्ण असणे आवश्यक आहेत. तसेच पात्रते सबंधी सर्व विहित कागदपत्रे सुपूर्द करणे आवश्यक आहे.

२) सदर सामंजस्य करार हा दि.३१ माहे मार्च २०२६ या कालावधीकरीता करण्यात येत आहे व तो निम्न स्वाक्षरीदार यांनी केलेल्या दिनांकापासुन अंमलात येत आहे. लिहून देणार हे खाजगी नोंदणीकृत सोनोलॉजिस्ट /रेडिओलॉजिस्ट असुन ते स्वतःच्या सोनोग्राफी केंद्रामध्ये आपली सेवा देऊन सदर योजनेतील गरोदर मातांची सोनोग्राफी करण्यास इच्छूक असल्याने लिहुन घेणार यांच्या कार्यालया मार्फत संदर्भित केलेल्या गरोदर मातांची सोनोग्राफी करतील.

३) या सामंजस्य कराराव्दारे फक्त गरोदर मातांची तपासणी करता येईल. सदरची तपासणी १४ ते १८ आठवड्यांमधे करण्यात येईल व गरज असल्यास स्त्री रोग तज्ञांच्यामते तिस-या तिमाहीमध्ये तपासणी करण्यात येईल. (३४ ते ३६ आठवडे)

४) सोनोग्राफीसाठी प्रति लाभार्थी खर्चाची कमाल मर्यादा रु ४००/- एवढी राहिल.

५) लिहून देणार हे सदर नमुद सोनोग्राफी सेवेबाबत लिहून घेणार यांसमार्फत जारी केलेल्या एम.सी.पी. कार्डवर केलेल्या सोनोग्राफी बाबत नोंद करतील. एका गरोदर मातेची कमाल दोन वेळा सोनोग्राफी या योजने अतंर्गत करण्यात येईल.

६) शासकीय संस्थेमधील नोंदणीप्रमाणे लिहून देणार यांसकडे सोनोग्राफी करीता संदर्भित करण्यात येणा-या गरोदर मातांना रेफरल स्लिप लिहून घेणार यांच्या कार्यालयामार्फत जारी करण्यात येईल.

७) लिहून घेणार व लिहून देणार हे संदर्भित करण्यात येत असलेल्या गरोदर मातांबाबतची स्वतंत्र नोंदवही जतन आपआपल्या कार्यालयात जतन करतील.

८) सोनोग्राफी तपासणी अहवाल एक प्रत संदर्भित करणा-या संस्थेने (लिहून घेणार) जतन करुन ठेवणे.निष्कर्ष हे एम.सी.पी. कार्डवर नोंदविण्यात येतील.

९) पीसीपीएनडीटी कायदयातील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता लिहून घेणार व लिहून देणार हे स्वतः घेतील तसेच सदर कायदयाचा भंग केल्यास जबाबदार राहतील.

१०) शासकीय संस्थेमधील नोंदणीप्रमाणे गरोदर मातांना देण्यात येणा-या पत्रामध्ये लिहून घेणार हे लिहून देणार यांचे नाव नोंद करतील.

११) लिहून देणार यांसमार्फत महिना अखेर एकुण संदर्भित केलेल्या मातांची यादी नोंदवहितील नोंदीनुसार तयार करण्यात येईल व सदर यादी पुढील कार्यवाहीकरीता लिहून घेणार यांच्या कार्यालयात ईमेल व हार्ड कॉपी व्दारे सादर करण्यात येईल.

१२)गरोदर मातांच्या संख्येनुसार निश्चित केलेल्या दराने पी.एफ.एम.एस प्रणालीव्दारे लिहून घेणार यांच्या कार्यालयामार्फत लिहून देणार यांस देयक अदा करण्यात येईल.

१३)सोनोलॉजिस्ट ने वैदयकिय अधिकारी यांनी संदर्भित केलेल्या संदर्भ चिठठी नुसार येणाऱ्या गरोदर मातांची सोनोग्राफी करावयाची आहे. संदर्भ चिठठी व्यतिरिक्त केलेल्या सोनोग्राफीचे देयक या कार्यालयाकडुन देय्य राहणार नाही याची नोंद घ्यावी.

१४)सोनोलॉजिस्ट ने देयका सोबत तपासलेल्या गरोदर मातांची रिपोर्ट ची एक छायांकित प्रत सादर करणे गरजेचे आहे.

Dist. Women & Child Hospital
सत्यमेव जयते
Sindhudurg - Kudal.

वैद्यकिय अधिक्षक, वर्ग-१
जिल्हा महिला व बाल रुग्णालय
सिंधुदुर्ग - कुडाळ

# बंधपत्र

मी / आम्ही गांभीर्य पूर्वक नमूद करीतो की मी / आम्ही वर नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून या निविदेसाठी माझे / आमचे दर निविदेसोबत असलेल्या प्रपत्र अ मध्ये नमूद करीत आहे / आहोत.

जर माझी / आमचे दरपत्रक स्वीकृत करणेत आली तर निविदेमधील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास मी / आम्ही बांधील राहू. या अटी व शर्तीचा भंग मी / आम्ही केल्यास या दरपत्राकातील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशीलनुसार मी / आम्ही केल्यास या दरपत्रकातील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशीलनुसार मी / आम्ही दंडनीय कार्यवाहीस पात्र राहू.

वरील सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहे.

स्थळ :-

दिनांक :-

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

नाव :-

पत्ता :-

# दरपत्रक

| अ.क्र | सोनोग्राफी | दर |
| --- | --- | --- |
| १ | १४ ते १८ आठवडयामध्ये सोनोग्राफी | |
| २ | Anomaly Scan | |

Dist. Women & Child Hospital
सत्यमेव जयते
* Sindhudurg - Kudal. *

वैद्यकिय अधिक्षक, वर्ग-१
जिल्हा महिला व बाल रूग्णालय
सिंधुदुर्ग - कुडाळ